आध्यात्मिक उपाय : उतारा

# उतारा आणि मानस दृष्ट

## (वास्तू, वाहन आणि झाड यांना दृष्ट न लागण्यासाठीच्या उपायांसह)

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ आणि अन्य**




## सनातन संस्था


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १.२.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५१ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्या साधकांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


१. उतारा — १०

- १ अ. उतारा देण्यामागील शास्त्र आणि त्यामुळे होणारी प्रक्रिया — १०
- १ आ. उतारा देणे आवश्यक आहे, हे ओळखण्याची काही लक्षणे — १०
- १ ई. उतारा देण्याच्या दोन पद्धती — ११
- १ ऊ. विदेशातील अन् हिंदु धर्मातील उतारा देण्याच्या पद्धती यांतील भेद — ३२
- १ ऐ. तीट लावणे, उतारा देणे आणि दृष्ट काढणे — ३५

२. वास्तूचे दृष्ट लागण्यापासून रक्षण करणे — ४१

- २ ई. वास्तूला दृष्ट लागू नये, यासाठी करावयाचे काही उपाय — ४३
- २ उ. वास्तूची दृष्ट काढणे — ४७

**३. वाहनाचे दृष्ट लागण्यापासून रक्षण करणे ४९**

३ अ. वाहन आणि वाहनातील व्यक्ती दूषित होण्याचे कारण आणि त्याचे परिणाम ४९

३ आ. वाहनाला दृष्ट लागू नये यासाठीचा उपाय ४९

३ इ. वाहनाची दृष्ट काढणे ५०

**४. झाडाचे दृष्ट लागण्यापासून रक्षण करणे ५२**

४ अ. झाडाला लागलेल्या दृष्टीची तीव्रता ओळखण्याची काही लक्षणे ५२

४ आ. झाडाला दृष्ट लागू नये यासाठी झाडाला विविध घटक टांगणे ५३

४ इ. झाडाची दृष्ट काढणे ५६

४ ई. झाडाची फलधारणा चांगली टिकावी, यासाठी योजावयाचे अन्य आध्यात्मिक उपाय आणि चैतन्यमय परिसराचे महत्त्व ५६

**५. स्थुलातून दृष्ट काढणे आणि मानस दृष्ट काढणे ५७**

**६. मानस दृष्ट काढणे ५७**

६ अ. मानस दृष्ट काढणे ही पद्धत केव्हा अवलंबावी ? ५७

६ आ. मानस उपाय करण्याचे महत्त्व आणि लाभ ५८

६ इ. मानस दृष्ट काढण्याचे प्रकार आणि पद्धत ५९

६ उ. मानस दृष्ट काढणे, केव्हा अधिक लाभदायक असते ? ५९

**७. उताराविषयक उपायांची मर्यादा आणि साधनेचे महत्त्व ७२**

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ७३**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ७७**

# मनोगत

भुताखेतांसारख्या अदृश्य शक्तींचा शोध पाश्चात्त्यांनी अलीकडच्या काळात लावला. आज भुतांविषयी माहिती देणारी अनेक संकेतस्थळेही उपलब्ध आहेत. आपल्या हिंदु पूर्वजांनी सहस्रावधी वर्षांपूर्वीच या अदृश्य शक्तींविषयी केवळ माहितीच सांगितलेली नाही, तर त्या शक्तींच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी सोप्या उपायपद्धतीही सांगितल्या आहेत. 'उतारा' ही यांपैकीच एक पद्धत आहे.

भूलोकी असतांना इच्छा आणि वासना अतृप्त राहिलेले आपलेच पूर्वज किंवा अन्य जीव इहलोक सोडून गेल्यावर आपल्याला त्रास देतात, यावर विश्वास बसत नाही ना ? मात्र हे सत्य समजून घेण्यासाठी यामागची कारणमीमांसा समजून घ्यायला हवी. अतृप्त पूर्वज आत्मे किंवा त्यांच्यावर नियंत्रण (ताबा) मिळवलेल्या वाईट शक्ती स्वतःच्या अन्नवासनांच्या तृप्तीसाठी किंवा अन्य इच्छांची पूर्ती करून घेण्यासाठी अन्नवासनेच्या माध्यमातून किंवा अन्य प्रकारे (उदा. वारंवार स्वप्नात साप दिसणे) त्रास देतात. कारण नसतांना अती भूक लागणे, वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्याची वारंवार इच्छा होणे, भूक मंदावणे, मद्य-सिगारेट यांचे अचानक व्यसन लागणे यांसारखी अन्नवासनेशी संबंधित लक्षणे आपण काही वेळा अनुभवतोही; पण 'वाईट शक्तींच्या त्रासांमुळे हे असे असते', याची आपल्याला कल्पना नसते. यावर उपाय म्हणून अतृप्त पूर्वजांच्या लिंगदेहांची किंवा वाईट शक्तींची तृप्ती करू शकणाऱ्या घटकांचा उतारा त्रास असलेल्या व्यक्तीवरून उतरवायचा असतो. व्यक्तीवरून उतारा उतरवल्यामुळे व्यक्तीचा त्रास घटण्यास साहाय्य होते.

उतारा देण्यासाठी कोणते घटक वापरावेत, उतारा देण्याच्या पद्धती कोणत्या, उतारा तिठ्यावर का ठेवावा, उताऱ्याचे पाण्यात विसर्जन का आणि कधी करावे अशा अनेक प्रश्नांची अध्यात्मशास्त्रीय कारणमीमांसा या ग्रंथात केली आहे.

व्यक्ती त्रासदायक स्पंदनांनी बाधित होणे, म्हणजे तिला 'दृष्ट लागणे'. व्यक्तीला जशी दृष्ट लागते, तशी वास्तू, वाहन आणि झाड यांनाही दृष्ट लागते. वास्तूला दृष्ट लागल्यामुळे वास्तूत रहाणाऱ्यांना शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक त्रास होतात. वाहनाला दृष्ट लागल्यामुळे अपघात होण्याचीही शक्यता असते. झाड दृष्टाळल्यास त्याच्या फलधारणेवर विपरित परिणाम होतो, तर काही वेळा ते मृत्यूमुखीही पडते. वास्तू, वाहन आणि झाड यांना दृष्ट लागूच नये, यासाठी कोणते उपाय अवलंबता येतात, तसेच त्यांना दृष्ट लागल्यास ती काढण्याची पद्धत यांचाही या ग्रंथात ऊहापोह केला आहे.

उतारा, दृष्ट यांसारख्या पद्धती या वाईट शक्तींचा त्रास दूर करण्याच्या स्थूल पद्धती आहेत. दृष्ट काढण्यासाठी लागणारे घटक, दृष्ट काढणारी व्यक्ती आणि दृष्ट ठेवण्याच्या जागेची उपलब्धता नसेल, तर अशा वेळी काय करायचे ? 'आपल्या उपास्यदेवतेला दृष्ट काढण्याविषयी प्रार्थना करून 'देवता आपली दृष्ट काढत आहे', या कृतीचे स्मरण करणे, हा यावरील उपाय आहे. हा मानस (मनाने) दृष्ट काढण्याचा प्रकार आहे. मानस दृष्ट काढणे ही अधिक सूक्ष्म स्तरावरील उपाययोजना असल्यामुळे परिणामकारक दृष्ट निघण्यासाठी दृष्ट काढणाऱ्यामध्ये ईश्वराप्रती भाव आणि तळमळ असणे किंवा त्याची आध्यात्मिक पातळी ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणे आवश्यक असते. या ग्रंथात मानस दृष्ट या पद्धतीचाही सांगोपांग विचार केला आहे.

'मीठ-मोहरी, नारळ, तुरटी आदींनी दृष्ट कशी काढावी ?' आणि 'कापूर, काळे उडीद, विड्याचे पान आदींनी दृष्ट कशी काढावी ?' या आमच्या ग्रंथांत, ज्या व्यक्तीची दृष्ट काढायची तिच्यावरून दृष्ट काढण्याचे घटक का ओवाळावेत, दृष्ट काढतांना भाव महत्त्वाचा का असतो, दृष्ट काढणाऱ्या व्यक्तीवर दृष्ट निघण्याची फलनिष्पत्ती कशी अवलंबून असते, यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. विषयाची द्विरुक्ती टाळण्यासाठी ही उत्तरे आम्ही या ग्रंथात दिलेली नाहीत.

अध्यात्म हे अनुभूतीचे शास्त्र आहे. अध्यात्मात सांगितलेल्या एखाद्या कृतीची अनुभूती आली की, त्या कृतीमागील शास्त्रावर लगेच श्रद्धा बसते. साधकांना उतारा, मानस दृष्ट अशा उपायांच्या संदर्भात आलेल्या अनुभूती ग्रंथात प्रसिद्ध करण्यामागील उद्देश वाचकांची श्रद्धा वाढावी, हाच आहे.

या ग्रंथात दिलेल्या उपायपद्धती आचरणात आणून अधिकाधिक जणांना वाईट शक्तींच्या त्रासांपासून सुटका करून घेता यावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.